# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात प्रादेशिक योजना व विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या शेतजमिनीवर बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेल्या बिगर शेती परवान्याची अट रदद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१) ४४२८२ (२०-४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने प्रादेशिक योजना व विकास आराखड्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्रातील शेतजमिनीवर बांधकाम करण्यासाठी आवश्यक असलेल्या बिगर शेती परवान्याची अट माहे २० जानेवारी, २०१६ रोजी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अट काढून टाकण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरुप काय आहेत व उद्योगासाठी त्याचा कोणत्या प्रकारे फायदा होणार आहे,

(४) असल्यास, राज्यात एमआयडीसीच्या अनेक जागा पडिक असून व काही अतिक्रमित असून अशा जागांचा उद्योगांसाठी उपयोग करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१८) :** (१), (२) व (३) दि.२२/१२/२०१४ रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध केल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये कलम ४२ अ हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींन्वये करण्यात आलेल्या प्रारूप अथवा अंतिम विकास योजनेत निश्चित केलेल्या वापरानुसार जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी कलम ४२ अन्वये अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

सदर तरतुदींच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतची स्पष्टता, कार्यपद्धती व जबाबदारी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१ दि. २२.०१.२०१६ अन्वये निश्चित करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, महाराष्ट्र अधिनियम क्र. ३०, दि. १५ एप्रिल, २०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये कलम ४२ ब आणि ४२ क हे दोन नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहेत.

जथे विकास योजना अंतिमरीत्या प्रसिध्द करण्यात आली असेल तेथे, धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत लागू असेल त्याप्रमाणे रुपांतर कर, अकृषिक आकारणी आणी नजराणा किंवा अधिमूल्य आणी इतर शासकीय देणी यांचा भरणा केला असेल तर त्या जमिनीस विकास योजनेत अनुज्ञेय असेल त्या वापरात रुपांतरीत करण्यात आले असल्याचे मानण्यात यावे अशी तरतूद कलम ४२ ब अन्वये करण्यात आली आहे.

तसेच एखादी जमीन ही, ज्या क्षेत्राकरिता प्रारूप प्रादेशिक योजना (Regional Plan) तयार करण्यात आली असेल आणि त्याबाबत आवश्यक ती नोटीस येथोचितरित्या प्रसिध्द करण्यात आली असेल अशी क्षेत्रात स्थित असेल त्याबाबतीत किंवा प्रादेशिक योजना मान्य करण्यात आली असेल व राज्यपत्र प्रसिघ्द करण्यात आली असेल, त्याबाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १८ अन्वये अशा जमिनीबाबत एकदा विकासाची परवनगी देण्यात आली असेल आणि जर रुपांतरीत कर व अकृषिक आकारणी आणि भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत नजराना किंवा अधिमूल्य व अशा रूपांतरणासाठी लादण्यात आलेली अन्य शासकीय देणी यांचा भरणा करण्यात आला असेल तर अशा जमिनीच्या वापरास संबंधित अकृषिक वापरामध्ये रुपांतरीत करण्यात आले असल्याचे मानण्याबाबतची तरतूद कलम ४२ क अन्वये करण्यात आली आहे.

(४) भुखंडधारकाने विहित कालावधीत भुखंड विकसित न केल्यामुळे महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाच्या धोरणानुसार भुखंड परत घेण्याची कार्यवाही करून महामंडळाच्या परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/B-६२०५४ दि. ०३.०६.२०१४ अन्वये सदर भुखंड उद्योग विस्तार किंवा प्राधान्य सदराखाली वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना स्वतःचे कार्यालय नसल्याबाबत**

**(२) ६६४९८ (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तलाठी व मंडळ अधिका-यांना स्वतःचे सुसज्ज असे कार्यालय नसल्याने त्यांना देऊळ अथवा ग्रामपंचायतीत कार्यालये थाटावी लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात ७६ मंडळ कार्यालये व ४५३ तलाठी कार्यालयाची आवश्यकता असून त्याकरिता सुमारे ७० कोटी निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी व मंडळ कार्यालयाच्या इमारती बांधकामाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) राज्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये स्वतंत्र कार्यालयीन इमारत / इतर शासकीय कार्यालयीन इमारत/ ग्रामपंचायत कार्यालय इमारत तसेच भाड्याच्या खाजगी इमारतीत कार्यरत आहेत. मात्र तलाठी किंवा मंडळ अधिकारी यांचे कार्यालय देवळात कार्यरत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) कोल्हापूर जिल्ह्यात खाजगी इमारतीत कार्यरत असणाऱ्या तसेच शासकीय इमारत जुनी झाल्याने ७६ मंडळ अधिकारी व ४१४ तलाठी कार्यालय इमारत बांधण्याची आवश्यकता आहे. याबाबत अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) राज्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये एवं निवासस्थाने बांधण्यासाठी महसूल विभागाकडून अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची व या कामांना निधी मंजूर करण्याची योजना शासन स्तरावर राबविण्यात येते. राधानगरी तालुक्यातील ०९ गावांमध्ये तलाठी कार्यालये एवं निवासस्थाने बांधकामास दि. २२/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच हातकणंगले तालुक्यातील कबनूर येथील तलाठी कार्यालय इमारत बांधकामास जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१७-१८ मध्ये निधी प्राप्त झाला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तहसिलदारांकडून यासंदर्भात प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन ते शासनास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

### मौजे शिरसंगी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील पाणंद रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(३) ८७२३६ (१२-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिरसंगी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) येथील रस्ता अतिक्रमण मुक्त करण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावरील अतिक्रमणे निष्काषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१-१०-२०१८) :** (१) व (२) महसुल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी पारित करण्यात आलेल्या विविध शासन निर्णयांनुसार

राज्यात दरवर्षी माहे १ ऑगस्ट ते पुढील वर्षाच्या ३१ जुलै या कालावधीदरम्यान राबविण्यात येणाऱ्या महाराजस्व अभियानांतर्गत विशेष मोहिमेत गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले पाणंद रस्ते लोकसहभागाद्वारे मोकळे करण्याबाबतच्या धोरणाच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयातील सर्व तालुक्यातील पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर मोहिमेंतर्गत मौजे शिरसंगी, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील "शिरसंगी ते केरकबोळ" हा पाणंद रस्ता अतिक्रमणमुक्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार, आजरा यांनी दि.२४/०३/२०१७ रोजी "सिरसंगी ते केरकबोळ " या पाणंद रस्त्याची स्थळपाहणी करून सदरचे पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणधारकांचे जाब जबाब नोंदविले आहेत व शेतातील उभी पिके काढून झाल्यानंतर रस्ता मोकळा करुन देण्याचे शेतकऱ्यांनी मान्य केले असल्याने तत्काळ कार्यवाही करण्यात आली नव्हती, परंतु अतिक्रमण धारकांनी मान्य केल्यानुसार अतिक्रमणे काढून टाकली नसल्याने तहसिलदार, आजरा यांचेकडून दि.०५/१२/२०१७ रोजी अंतिम नोटिस संबंधित ४१ इसमांना लागू केली असून त्याप्रमाणे सदरचे अतिक्रमण निष्कासनाबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा पाषाण (ता.हवेली, जि.पुणे) येथील जागा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस देण्याबाबत**

**(४) ८८५६४ (१२-०८-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पाषाण (ता.हवेली, जि.पुणे) येथील सेक्टर क्रमांक १२१(२)(क) येथील ०.९१ आर इतकी जागा औद्योगिक प्रशिक्षण संस्था औंध पुणे ७ या संस्थेच्या विकासासाठी आरक्षित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षित जागेवर मुलभूत प्रशिक्षण तथा अनुवांशिक सूचना केंद्राच्या स्वतंत्र कामकाजासाठी नविन इमारत व व्यवसाय प्रात्यक्षिकांचे कार्यशाळेची इमारत बांधणे व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी २०० विद्यार्थी क्षमतेचे स्वतंत्र वस्तीगृह तसेच विभागीय प्रशासकीय इमारत बांधण्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने प्रस्तावित केले असून सदर जागा ताब्यात घेण्यासाठी सन १९९७ पासून व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय मार्फत पाठपुरावा सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा आय.टी.आय. औंध व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय पुणे यांच्या ताब्यात देण्याबाबत शिवाजीनगर पुणे वि.स.स. ह्यांनी १८ एप्रिल, २०१५ रोजी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी पुणे यांस २३ एप्रिल, २०१५ रोजी लेखी पत्राद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जागा व्यवसाय प्रशिक्षण संचालनालय पुणे या संस्थेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१८) :** (१) पुणे शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेनुसार सदर स.नं. १२१/२ (क) येथील क्षेत्र हे प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व औद्योगिक प्रशिक्षण संस्था करिता आरक्षित होते. तथापि पुणे शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेनुसार सदर क्षेत्र प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान यांकरिता आरक्षित आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाने अभिलेखांची तपासणी केली असता त्यांमध्ये याविषयीचा पत्रव्यवहार दिसून येत नाही.

(४) जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयास फक्त प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा यांबाबतचा भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झालेला असून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरिता भूसंपादनाचा प्रस्ताव प्राप्त नसल्याने त्या कार्यालयाने त्याबाबत कार्यवाही केलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणारे दाखले बंद करण्यात आल्याबाबत

**(५) ९५६५७ (२१-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ पासून वीस प्रकारचे दाखले न देण्याचा निर्णय घेतला असून याबाबतचे लेखी निवेदन तहसिलदार, तासगांव यांना तलाठी संघाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक,नांदेड व गोंदिया जिल्हयातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणारे दाखले व भूमिहीन अपंग, विधवा व परितक्त्या यांना २१०० रु. आत उत्पन्न न देण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१७ पासून घेतल्याने नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नाशिक,नांदेड व गोंदिया जिल्ह्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयामार्फत उपरोक्त दाखले व उत्पन्न देण्याची कार्यवाही पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१८) :** (१) व (२) याबाबत महाराष्ट्र राज्य तलाठी संघाकडून शासनाकडे निवेदन प्राप्त झाले आहे,
सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्यात काही भागात तलाठ्यांनी त्यांच्या स्तरावरून देत असलेले दाखले देणे बंद केले होते. तथापि, कांही जिल्हयात अर्जदारांकडून स्वयंघोषणापत्र घेऊन दाखले देण्यात येत आहेत. सध्या नांदेड, नाशिक, गोंदिया जिल्हयात दाखले देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) ई- डिस्ट्रीक्ट प्रकल्पांतर्गत नागरिकांना देण्यात येणारे विविध दाखले व प्रमाणपत्रे यांचे प्रमाणीकरण करणे व दाखले देण्याच्या पध्दतीत सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दि. ३१ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तलाठी यांनी द्यावयाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्याच्या पध्दतीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक दि. १८ ऑक्टोंबर २०१७ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.
तसेच उपरोक्त दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दि. ३१ मार्च, २०१२ च्या शासननिर्णयामध्ये कांही शब्द प्रयोगांमुळे प्रशासकीय स्तरावर कोणत्याही स्वरुपाची संदिग्धता राहू नये या दृष्टीने दि. ३ नोव्हेंबर २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, ज्याच्या आधारे राज्यात सर्व ठिकाणी अर्जदारांच्या स्वंय घोषणापत्राच्या आधारे तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून अहवाल देण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(६) ९६८५६ (१०-०१-२०१८). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि.हिंगोली) तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयाची सार्वजनिक बांधकाम विभाग व वरिष्ठ दुय्यम निबंधक कार्यालयाने दुर्लक्ष केल्यामुळे दुरवस्था झाली असल्याचे माहे जुलै २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयाच्या इमारतीतील छताची पियुसी अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याने खाली कोसळून पडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच या कार्यालयात काही ठिकाणी लोंबकळत्या पियुसीमुळे जाणे-येणे करणे गैरसोईचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) दुय्यम निबंधक कार्यालय, सेनगांव या कार्यालयाची प्रशासकीय इमारत सुस्थितीत आहे. सदर कार्यालयाचे छत हे आर.सी.सी. स्लॅबचे आहे. तथापि, सदर कार्यालयाचे सिलींग हे पी.ओ.पी. चे असून सिलींगला दोन वर्षापूर्वी तडे गेले होते. यास्तव सदरचे पी.ओ.पी. काढून टाकण्यात आले आहे. सिलींगचे पी.ओ.पी. काढून टाकल्यामुळे इमारतीस कोणत्याही प्रकारचा धोका नसून इमारत तांत्रिक दृष्ट्या सुस्थितीत असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांनी त्यांच्या दि.२१.०६.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) सदरची बाब दुय्यम निबंधक कार्यालय, सेनगांव यांच्या दि.१७.०५.२०१८ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तुमसर (ता.तुमसर, जि.भंडारा) शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमुळे अपघातात वाढ झाल्याबाबत**

**(७) १०११८६ (०१-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (ता.तुमसर, जि.भंडारा) शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमुळे अपघातात वाढ झाली असल्याने, खड्डे दुरुस्त करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतीनिधिंनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्त्याची खड्डे भरण्याची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) कामे पूर्ण झाली असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील श्री. शंकराचार्य करवीर पीठ या संस्थानाच्या हजारो एकर जमिनी नियमबाह्यरीत्या हस्तांतरित केल्याबाबत**

**(८) १०१८८२ (२१-१२-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील श्री.शंकराचार्य करवीर पीठ या संस्थानाच्या हजारो एकर जमिनी नियमबाह्यरीत्या हस्तांतरित केल्या प्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सन २००९-१० दरम्यान चौकशीचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संस्थानास जमिनी परत देण्याबाबत तसेच बेकायदेशीरपणे जमीन हस्तांतरण करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग दिनांक ३० जुलै, २०१० मधील निदेशाप्रमाणे देवस्थानच्या /मठ/ सेवा इनाम जमिनींच्या तपासणी करुन सदर तपासणीत बेकायदेशिररित्या व पुर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत झालेल्या जमिनी, विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन देवस्थानच्या ताब्यात पुर्ववत देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून दिनांक १६.०८.२०१० च्या पत्रान्वये जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी यांना कार्यवाहीचे निदेश देण्यात आले होते.

(२), (३) व (४) श्री. स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या जमीनीच्या हस्तांतरणाबाबत राधानगरी तालुक्यातील कानोली तर्फे असंडोली येथील जमीन हस्तांतरणाची २५ प्रकरणे फेरतपासणीमध्ये घेऊन संबधीत फेरफार रद्द करण्यात आले आहेत. तथापि सदर प्रकरणी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिलेला निर्णय तत्कालिन मा. राज्यमंत्री यांनी कायम केला असून त्याविरूद्ध मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट पिटीशनमध्ये अंतिम निर्णयापर्यंत मनाई हुकूम दिलेला असल्याने फेरफार क्रमांक २२२ रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

हातकणंगले तालुक्यातील ३ गावांमधील श्री. स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाच्या जमिनीवरील कुळहक्क कमी करुन पुर्ववत करवीर पीठाच्या नावे करण्यात आल्या आहेत. गडहिंग्लज तालुक्यातील मौजे हिटणी व मौजे हेळेवाडी येथील एकूण १४६ शर्तभंग प्रकरणी श्री. स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाकडून दाखल करण्यात आलेली प्रकरणे अंतिम सुनावणी घेऊन निकाली काढलेली आहेत. तसेच ९ प्रकरणे तांत्रिकदृष्टया चालविता येत नसल्याने व १६ प्रकरणे कायदेशीर तरतूदीशिवाय दाखल केली असल्याने निकाली काढण्यात आली आहेत. १० प्रकरणे करवीर पीठाशी संबंधित नाहीत. उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांचे आदेश श्री. स्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य करवीर पीठाने अपर जिल्हाधिकारी, जि, कोल्हापूर यांचेकडे आव्हानित केले आहेत. सदर प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबित आहेत.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील १० हजार ४१८ हेक्टर शासकीय जमीनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(९) १०२७८८ (२१-१२-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील १० हजार ४१८ हेक्टर शासकीय जमीनीवर साडे तेरा हजार नागरिकांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत व अतिक्रमण करणाऱ्यावर तसेच या अतिक्रमणावर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यातील एकूण १०४१८ हेक्टर ८२ आर जमिनीवर एकूण १३५१० अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यापैकी ९१९.०४ हे. आर एवढ्या जमिनीवर ७७४ व्यक्तींनी केलेले अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले आहे. शासनाच्या प्रचलित नियम/धोरणानुसार अतिक्रमणधारकांचे अतिक्रमण निष्कासित करणे किंवा यथास्थिती नियमित करण्याचे योजिले आहे.

शासन निर्णय दिनांक १२.०७.२०११ नुसार गायरान जमिनीवर कोणतेही बेकायदेशिर अतिक्रमण निदर्शनास आल्यास, सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सर्व उप विभागीय अधिकारी, तहसिलदार व स्थानिक स्वराज्य संस्था यांना निर्देशित केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सावरोली (ता.तलासरी, जि.ठाणे) येथील सर्वे नं १३५ मधील ४० एकर जागेबाबत**

**(१०) १०३६२४ (२२-१२-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावरोली (ता.तलासरी, जि.ठाणे) येथील सर्वे नं १३५ मधील ४० एकर जागेवर आयटीडी सिमेटेशन इंडिया कंपनीने अकृषक परवानगी न घेता काम सुरु केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेत माहया दादोडा या आदिवासी व्यक्तीच्या ताब्यातील जागा व घर गेल्याने त्यांनी तहसिलदार, तलासरी यांच्याकडे दिनांक १० मार्च, २०१६ रोजी तक्रार करून उक्त वादग्रस्त जागेला अकृषक परवाना न देण्याबाबत लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार आयटीडी सिमेटेशन इंडिया कंपनीविरुद्ध तसेच इतर दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे सावरोली, ता.तलासरी जि.पालघर येथील स.नं. १३५/१/२/अ क्षेत्र ४-१०.० हे.आर व स.नं.१३५-१/२/ब, क्षेत्र ४-००.० हे.आर ही मिळकत अधिकार अभिलेखात आयटीडी सिमेंटेशन इंडिया यांचे नावे दाखल आहे. उक्त जमिनीत सदर कंपनीने अकृषिक परवानगी न घेता कंपनीचे साहित्य व यंत्रसामुग्री ठेवलेली आहे. सदर कंपनीस अकृषिक वापरास परवानगी देण्यात येऊ नये अशा आशयाचे दिनांक १०.०३.२०१६ चे निवेदन श्री.माह्या मरल्या दादोडा व श्री.किशोर रिश्या सुतार यांचेकडून प्राप्त झाले आहे. त्यानुषंगाने चौकशी करुन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांनी तहसिलदार, तलासरी यांना कळविले आहे.

---

**महसूल विभागातील अधिकारी इमारतीच्या पायाच्या कामासाठी केलेल्या खोदकामातून निघणाऱ्या गौणखनिजावर दंड आकारात असल्याबाबत**

**(११) १०४७४१ (२२-१२-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रमोटर्स व बिल्डर्स असोसिएशन ऑफ पुणे विरुध्द महाराष्ट्र राज्य या सर्वोच्च न्यायालयातील दिवाणी अपिल क्र. १०७१७ व १०७१८/२०१४ मध्ये दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी आदेश पारित होऊन इमारतीचे बांधकाम करतांना पायाच्या कामासाठी केलेल्या खोदकामातून निघनाऱ्या गौणखनिजाचा पायाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुनर्वापर करण्यात आला असेल तर त्यास स्वामित्वधन लागणार नाही असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास म.ज.म.अधिनियम चे कलम ४८/(७) च्या तरतूदी लागू होणार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असले तरी तलाठी किंवा तत्सम महसूल विभागातील अधिकारी यांचेमार्फत या गौणखनिजांचे मोजमाप व पंचनामा करुन अनधिकृत गौणखनिज उत्खनन केल्याबाबतच्या नोटीसा संबधित विकासक किंवा जमिनमालक यांना बजावण्यात येऊन मालमत्ता जप्ती करणे इत्यादी प्रकारची कारवाई करून नाहक त्रास दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजीपासून अद्यापपर्यंत अशा किती प्रकरणामध्ये कारवाई करण्यात आली आहे,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अशी प्रकरणे घडू नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत तसेचया प्रकरणी नियम डावलून कारवाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१८) :** (१) व (२) होय, दिवाणी अपील क्र.१०७१७ व १०७१८/२०१४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.३ डिसेंबर,२०१४ रोजी दिलेल्या आदेशास अनुलक्षून दि.११/५/२०१५ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये ज्यावेळी जमिनीच्या एखाद्या

भूखंडाचा विकास करताना मातीचे उत्खनन करुन ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरिता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासांच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील महत्त्वाची प्रशासकीय कार्यालये एकाच ठिकाणी बांधण्याबाबत**

**(१२) १०७०३५ (२७-०३-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील अनेक महत्वाची प्रशासकीय कार्यालये भाडेतत्वावर असुन सदरहू सर्व कार्यालये वेगवेगळया ठिकाणी असल्याने शासकीय कामे करताना नागरीकांना अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार कोल्हापूर जिल्ह्यातील भाडेकरारावर असलेली सर्व कार्यालये शासकीय जागेवर एकाच ठिकाणी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) कोल्हापूर जिल्हयातील एकूण १२ तालुक्यांपैकी कागल, शिरोळ, चंदगड,आजरा व गगनबावडा या पाच तालुक्यांमध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. हातकणंगले येथील इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. पन्हाळा व शाहुवाडी येथे जागा उपलब्ध नाही. राधानगरी , भुदरगड, गडहिंग्लज, करवीर या ठिकाणी शासकीय कार्यालय एकाच ठिकाणी बांधण्याबाबत आराखडा व नकाशे उपलब्ध करुन घेण्याचे काम प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे मांडवे तर्फे बामणगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील**
**अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत**

**(१३) १०८०२२ (२७-०३-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांडवे तर्फे बामणगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सर्व्हे नं. ५१/९ या जागेवर जिल्हाधिकारी, रायगड यांनी बिनशेतीसह बांधकाम परवानगी दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जागेवर बांधकाम करताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार रस्त्याच्या मध्यापासून ४७ मीटरच्या आत बांधकाम करण्यात येऊ नये अशी अट असतांना संबंधितानी नियमांचा भंग करुन अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील नागरिकांनी या नियमबाहय बांधकामाबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे तक्रार दाखल केली असून उक्त तक्रारीच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून सदरच्या अनधिकृत बांधकामावर व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर कारवाई करून या प्रकरणी कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) मौजे मांडवे तर्फे बामणगांव येथील गट नं.५० व गट नं ५१/९ या मिळकतीस जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक १६.११.२०१५ च्या आदेशान्वये अटी व शर्तीस अधीन राहून निवासी व वाणिज्य या कारणासाठी बिनशेती व बांधकाम परवानगी देण्यात आली होती.
(२) श्री.निलेश जयहिंद मोरे यांनी अलिबाग-मुरुड रस्त्याच्या मध्यापासून १४ ते १५ मीटर अंतरावर बांधकाम केले आहे.
(३) (४) व (५) तहसिलदार, अलिबाग यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी,चौल यांचे मार्फत चौकशी केली असता श्री.निलेश जयहिंद मोरे यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे आढळल्याने तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक २५.०८.२०१४ रोजी श्री.मोरे यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४५ अन्वये नोटीस बजावली होती. सदर नोटीसीस खुलासा सादर न केल्याने दिनांक ०५.०९.२०१४ रोजी सदर अनधिकृत बांधकामाबाबत रु.७३,८००/- इतकी रक्कम शासनजमा करणेबाबत नोटीस बजावण्यात आली त्यानुसार श्री.मोरे यांचेकडून सदरची रक्कम दिनांक ०५.०९.२०१४ रोजी शासनजमा करण्यात आली होती. तद्नंतर तहसिलदार, अलिबाग यांचेकडे उक्त बांधकामाबाबत दिनांक ३०.०६.२०१६ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, चौल यांनी चौकशी केली असता श्री.मोरे यांनी अलिबाग-मुरुड रस्त्याच्या मध्यापासून १४ ते १५ मीटर अंतरावर बांधकाम केल्याचे तसेच मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक ०९.०३.२००१ मधील तरतुदीनुसार नियमांचा भंग केल्याचे स्पष्ट झाले. तहसिल कार्यालय अलिबाग यांचे दिनांक २९.०६.२०१७ व दिनांक २५.१०.२०१७ तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांच्या दिनांक ०९.०१.२०१८ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक १६.११.२०१५ च्या बिनशेती आदेशामधील शर्त क्र.२१ नुसार कार्यवाही

करण्याबाबत कळविले आहे. तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचे दिनांक ०९.०१.२०१८ च्या रजिस्टर्ड पोस्टाने श्री.निलेश जयहिंद मोरे यांना सदरचे बिनशेती व बांधकाम परवानगी आदेश रद्द का करणेंत येऊ नये याबाबतची नोटीस पाठविण्यात आली तथापि उपलब्ध दोन्ही पत्त्यावर ते राहत नसल्याने नोटीस कार्यालयाकडे परत करण्यात आली असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २३० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**सराठी, बोदवड, पिंपळदरी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील शिव रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(१४) ११०७८७ (२७-०३-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सराठी, बोदवड, पिंपळदरी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील शिव रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे तेथील शेतक-यांना आपल्या शेतातील शेतमाल वाहतूकीसाठी उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील शेतकरी अडचणीत आला असून त्यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सराठी, बोदवड, पिंपळदरी येथील शिव रस्त्यावरील अतिक्रमण हटवून शेतकऱ्यांना रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे बोदवड, सराटी व पिंपळदरी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथील शिवरस्ता अंशत: अतिक्रमित असून संबंधित शेतकऱ्यांना शेतमाल ने- आण करण्यासाठी पर्यायी रस्ता तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध आहे.

सराटी, बोदवड, पिंपळदरी या गावांच्या शिवरस्त्याची अभिलेखात नोंद नसल्याने दोन्ही शिवामधील मध्यभागी हद्दी व खुणा पंचासमक्ष निश्चित केल्या असून सदर रस्ता मोकळा करून देण्याकामी संबंधित गटांच्या मालकांनी संमती दिली आहे.

विषयांकित रस्ता संयुक्त पथकाद्वारे अतिक्रमणमुक्त करण्यात आला असून ज्या ठिकाणी शिवरस्ता उपलब्ध नाही, तेथे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम संहिता १९६६ चे कलम १४३ खाली तहसिलदार यांचे स्तरावर सुनावणी घेऊन गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(१५) ११११८९ (२७-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील शासकीय अधिकारी व कर्मचारी, निवासस्थाने नसल्यामुळे मुख्यालयी राहत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार रेणापूर तालुक्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) रेणापूर तालुक्यात महसूल कर्मचारी मुख्यालयी राहतात व कार्यालयीन वेळेत हजर राहून कामकाज पार पाडतात. रेणापूर तालुक्यात ६ शासकीय निवासस्थाने आहेत, त्यापैकी १ निवासस्थान मागणी अभावी रिक्त आहे. काही महसूल कर्मचारी सोयीनुसार भाड्याने खाजगी निवासस्थान उपलब्ध करुन घेवून राहतात. अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून शासकीय निवासस्थानाची मागणी प्राप्त झाल्यास शासकीय निवासस्थान बांधकाम करण्याबाबत उचित विचार करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील जुना पुणे नाका ते पत्रकार भवन दरम्यान करण्यात येणा-या उड्डाणपुलाची निविदा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जारी केल्याबाबत**

**(१६) १११९०० (१२-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील जुना पुणे नाका ते पत्रकार भवन यादरम्यान करण्यात येणा-या उड्डाणपुलाची निविदा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जारी केली असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता महानगरपालिकेकडून अद्याप भूसंपादनाची प्रक्रिया सुरु झाली नाही मात्र महामार्ग प्राधिकरणाकडून निविदा प्रक्रिया सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे महानगरपालिका व प्राधिकरण यांमध्ये समन्वय नसल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील दोन्ही संस्थांनी समन्वय ठेवून येथे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता सदरील उड्डाणपूल तातडीने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दि. १२ मे २०१८ रोजी मा.विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे संयुक्त आढावा बैठक होऊन जिल्हाधिकारी व भूसंपादन अधिकारी यांना विहीत वेळेत भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन जमीन ताब्यात देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सोलापूर शहरातील जुना पुणे नाका ते पत्रकार भवन यादरम्यान जुना पुणे नाका ते सात रस्ताचौक व बोरामणी नाका (रा.म.९) - कुमठा चौक ते रा.म.१३ चौक अश्या दोन प्रस्तावित उड्डाणपूलांबाबतची निविदा प्रक्रिया सुरु असून सदर उड्डाणपूल बांधण्यासाठी जमिनीचा ताबा घेण्यात आल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल. तसेच भूसंपादन व निविदा प्रक्रिया एकाच वेळी करण्यात येत असल्याचे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) महानगरपलिका व प्राधिकरण यांच्यामध्ये समन्वय साधून काम सुरु आहे.

(४) सदर ठिकाणची वाहतूक कोंडी लक्षात घेवून प्रस्तावित दोन्ही उड्डाणपूलांची कामे भूसंपादन व निविदा प्रक्रिया एकाच वेळी पार पाडून तातडीने सुरु करण्याचे नियोजन आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील दुय्यम निबंधकाची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) ११४०१४ (२७-०३-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील विविध ठिकाणच्या दुय्यम निबंधक कार्यालयातील १८ दुय्यम निबंधकाच्या पदांपैकी १२ पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच सदरील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१८) :** (१) होय.

(२)] (३) व (४) दुय्यम निबंधक श्रेणी-१ या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांचेमार्फत सुरु असून पदोन्नतीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूर जिल्हयातील रिक्त पदे भरण्यात येतील.

---

**माकुणसार (ता.जि.पालघर) येथे केलेल्या अतिक्रमणाबाबत**

**(१८) ११४३५० (२७-०३-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (ता.जि.पालघर) येथील माकुणसार गावातील साडे सात एकर जमिनीवर बेकायदा काटेरी तारेचे कुंपण घालून अतिक्रमण केल्याने सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची मागणी ग्रामस्थानी केल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर जमीनीवरील अतिक्रमण निष्कासित करून अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) मौजे माकुणसार ता.जि.पालघर येथील स.नं.१८० या मिळकतीवरील बेकायदेशीर अतिक्रमणाबाबत कार्यवाही करणेसंदर्भात सरपंच, माकुणसार तसेच सदस्य जिल्हा नियोजन समिती, पालघर यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक ०३.०२.२०१८ अन्वये निवेदन सादर केले आहे. प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक २०.०२.२०१८ व दिनांक २१.०२.२०१८ च्या पत्रान्वये तहसिलदार, पालघर यांना चौकशी व नियमानुसार कार्यवाही करुन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मौजे माकुणसार, ता.जि.पालघर येथील स.नं.१८० क्षेत्र ३-११.६ हे.आर ही जमीन श्री.गंगाधर गजानन दांडेकर व श्री.विश्वनाथ गजानन दांडेकर यांचे नांवे गा.न.नं ७/१२ सदरी दाखल आहे. सदर जमिनीपैकी काही क्षेत्रावर पिकपाहणी सदरी श्री.सुनिल गोकर्ण दुबे यांचे नांवे दाखल झाले असून, सदर जमिनीवर श्री.सुनिल गोकर्ण दुबे यांनी तारेचे कुंपण केलेले आहे. सदरचे काम तात्काळ स्थगित करुन अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना तहसिलदार, पालघर यांनी संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांना दिनांक ०२.०६.२०१८ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. तसेच उक्त पीकपाहणी आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५७ अन्वये उपविभागीय अधिकारी, पालघर यांचे न्यायालयात पुनरीक्षणासाठी दाखल असून अंतिम निर्णय प्रलंबित आहे.

---

**चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील सर्व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत**

**(१९) ११५०७९ (२७-०३-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील सर्व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी मुख्यालयी रहात नसल्याचे नुकतेच उघडकीस आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यालयी राहत नसतांना खोटे दाखले देवून मुख्यालयी राहण्याचा भत्ता सदर अधिकारी व कर्मचारी उचल करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाची फसवणुक करण्याऱ्या उक्त अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास] विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्हयातील चांदुर-रेल्वे तालुक्यात कांही अधिकारी/ कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. जे अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत त्यांना घरभाडे भत्ता अदा करण्यात येत नाही. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके याव्दारे दिलेल्या सूचनांनुसार सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक असल्याचे दि. २२ फेब्रुवारी २०१८ च्या परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांनी सर्व संबंधितांना निर्देश दिलेले आहे. त्यामध्ये दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे घरभाडे भत्ता रोखून धरण्यात येईल व कसूर करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खरीवली तर्फे कोहोज (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी शेतकऱ्याची जमीन परत मिळण्याबाबत**

**(२०) ११६२०४ (२७-०३-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खरीवली तर्फे कोहोज (ता.वाडा, जि.पालघर) येथील बिगर आदिवासीकडे गेलेली आदिवासी शेतकऱ्याची जमिन पुन्हा आदिवासी शेतकऱ्यास प्रत्यार्पित करुन मिळण्याबाबत मंडळ अधिकारी कार्यालय कंचाड यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार, वाडा यांना पत्र पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) मौजे खरीवली तर्फे कोहोज (ता.वाडा, जि.पालघर) येथील आदिवासी शेतक-याची जमीन पुन्हा आदिवासी शेतक-यांना प्रत्यार्पित करुन मिळण्याबाबत मंडळ अधिकारी कंचाड यांनी दि. १९.०९.२०१७ रोजी तहसिलदार वाडा यांच्याकडे अहवाल सादर केला होता. तसेच विषयांकित जमिनीबाबत दाखल केलेल्या अपिलात अपर आयुक्त, कोकण यांनी दि. २८.०१.१९८५ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशातील

परिच्छेद क्र.६ मध्ये नमूद मुद्यांबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार, वाडा व उपविभागीय अधिकारी, वाडा यांना जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि. १५.०६.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदरचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या स्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

### सार्वजनिक बांधकाम विभागातील मुख्य अभियंत्याची ११ रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) ११६९१० (०१-०९-२०१८). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागात मुख्य अभियंत्याच्या ११ जागा रिक्त असून या जागा अधिक्षक अभियंता यांना बढती देऊन भरण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत मुख्य अभियंता म्हणुन काम करण्यासाठी एकही अनुभवी अधिक्षक अभियंता नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन मुख्य अभियंत्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरुन मुख्य अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या ९ अधिकाऱ्यांना दि. २०/०७/२०१८ व दि. ३०/०७/२०१८ च्या आदेशान्वये मुख्य अभियंता पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केसरी-फनसवडे-चौकुळ या रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाबाबत**

**(२२) ११७३९९ (२०-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंबोली घाटाला पर्याय ठरणाऱ्या केसरी-फनसवडे - चौकुळ या रस्त्यासाठी संपादित करावयाच्या जमिनींचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व भूसंपादनाच्या प्रस्तावास मंजुरी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

केसरी-फनसवडे-चौकुळ या रस्त्यासाठी भुसंपादन करण्यासाठी सन-२०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात ५०५४(०४)अंतर्गत ७५.०लक्ष किंमतीचे काम मंजुर आहे.सद्य:स्थितीत वनजमिन हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करणेसाठी सल्लागार नेमणूकीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेडी-रेवस (जि.सिंधुदुर्ग) या सागरी मार्गावरील आदिनारायण मंदिर येथील पुलाच्या बांधकामाबाबत**

**(२३) ११७५३१ (२०-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेडी-रेवस (जि.सिंधुदुर्ग) या सागरी मार्गावरील आदिनारायण मंदिर येथे नवीन पुल बांधण्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु असल्याने परुळे या पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या ठिकाणी व मालवण, कुडाळ, वेंगुर्ले तालुक्यासह गोव्याकडे जाणाऱ्या पर्यटकांना व वाहनांना अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे काम तातडीने करण्याबाबत ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त पुलाचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे तसेच त्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रश्नाधीन परुळे आदिनारायण मंदीर येथील पूलाच्या पुनर्बांधणीचे काम दि.१५.४.२०१८ पासून सुरु करण्यात येऊन पूलाचे काम ४० दिवसात पूर्ण करण्यात आले आहे.

सदर पूल दि.२५.५.२०१८ पासून वाहतुकीस खुला करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत पुलावरील वाहतुक सुरळीतपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळंबोली (ता.उरण, जि.रायगड) महामार्गावर सुरु असलेल्या उड्डाणपूलाखालून मार्गिका ठेवण्याबबत

**(२४) ११७७२९ (२०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.उरण, जि.रायगड) महामार्गावर सुरु असलेल्या उड्डाणपूलाखालून श्री कालभैरव मंदिरासमोर मार्गिका ठेवण्याची मागणी तेथील लोकप्रतीनिधिनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी स्थानिक नगरसेवक व स्थानिक नागरिक यांनी केलेल्या मागणीनुसार सर्व्हेक्षण करुन तयार करण्यात आलेल्या सुसाध्यता अहवालास महामंडळाची मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे कंत्राटदारास अंडरपासचे काम करण्यास कळविले असून प्रत्यक्षात काम सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रोहे व नागोठणे (जि.रायगड) या दोन शहरांना जोडणा-या भिसे खिंडीतील संरक्षक लोखंडी रोलिंग्जची दुरुस्ती करण्याबाबत

**(२५) ११७७३० (२०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहे व नागोठणे (जि.रायगड) या दोन शहरांना जोडणा-या भिसे खिंडीतील संरक्षक लोखंडी रोलिंग्ज वाहनांच्या अपघातामुळे मोडकळीस आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून या संरक्षक लोखंडी रोलिंग्जची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकीत काम मंजुरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) बाजारपेठेतील महाविद्यालयाच्या आवारात मोबाईल टॉवर उभारल्याबाबत**

**(२६) ११८०७३ (२०-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी वस्ती अथवा शाळेच्या जवळपास मोबाईल टॉवर उभारु नये असा शासकीय नियम असतांना मुरबाड पासून २४ कि.मी.अंतरावर असलेल्या धसई बाजारपेठेतील महात्मा गांधी विद्यालय आणि जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या आवारात मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश तहसिलदारांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर टॉवरवर तसेच टॉवर उभारणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) अशा आशयाचे वृत्त दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी एका वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते.

तथापि, त्यापूर्वीच मौजे धसई, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील स.नं. ९७/३ या जमिनीमध्ये मोबाईल टॉवर असल्याचे निदर्शनास आल्याने सक्षम प्राधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय जमिनीच्या वापरात बदल केल्यावरुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ प्रमाणे दिनांक ३१/०१/२०१८ रोजी संबंधितास दंडात्मक रकमेची नोटीस बजावली असून तहसिलदार, मुरबाड यांच्या कार्यालयामार्फत दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**खंडाळा कोरेगाव- सांगली- शिरोळ या रस्त्याचे दुपदरीकरण व हेळगांव-पाडळी-सुर्ली-रहिमतपूर या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(२७) ११८४८८ (२०-०७-२०१८). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड-उत्तर (जि.सातारा) मतदार संघातील खंडाळा कोरेगाव- सांगली- शिरोळ रामा १४२ (भाग मसूर ते यशवंतनगर) या रस्त्याचे दुपरीकरण करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच मतदारसंघातील हेळगांव-पाडळी-सुर्ली-रहिमतपूर प्रजिमा ३३ मधील सुर्ली ते रहिमतपूर या टप्प्यातील रस्त्याचेही चौपदरीकरण करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार खंडाळा कोरेगाव- सांगली- शिरोळ या रस्त्याचे दुपरीकरण व हेळगांव-पाडळी-सुर्ली-रहिमतपूर या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याच्या सुधारणेबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील तहसिलदार व प्रांत कार्यालयांकडे वाहने नसल्याबाबत**

**(२८) ११९१४२ (२०-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात १४ तहसिलदार व ७ प्रांत कार्यालये असून यापैकी निम्म्या अधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाहने उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील वाहने नसणाऱ्या तहसिलदार व प्रांत कार्यालयांकडे वाहने मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सदर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने तहसीलदार व प्रांत कार्यालयांना तातडीने वाहने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) अहमदनगर जिल्हयातील अपर जिल्हाधिकारी यांना १, उपविभागीय अधिकारी यांना १ तसेच तहसिलदार यांना ६ अशा एकूण ८ अधिकाऱ्यांना त्यांच्या निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस दिनांक ०१/०६/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मूरगूड-कागल या रस्त्याच्या बाजूने गटारी काढण्याबाबत**

**(२९) १२०९१३ (२०-०७-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावर्डे बुद्रुक (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील मूरगूड-कागल या रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारी नसल्याने प्रत्येक पावसाळयात रस्त्यावरील पाण्यामुळे शेतजमिनीचे बांध फुटत असून शेतातील पिके वाहून जाऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या दोन्ही बाजूने गटारी काढण्याबाबत मागणी सातत्याने शेतकऱ्यांकडून तसेच ग्रामपंचायतीकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार मूरगूड-कागल या रस्त्याच्या बाजूने गटारी काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नांकित सावर्डे बुद्रुक येथील मूरगूड-कागल हा रस्त अनुक्रमे येवती पाटी वाचणी साके सावर्डे चौंडाळ प्रजिमा क्र.४२ व ब्रिद्री सोनाळी सावर्डे केनवडे वस्तवडे आणूर नंदयाळ रस्ता प्रजिमा ४६ चा भाग आहे. स्थानिक शेतकरी व ग्रामपंचायतीकडून सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूने गटारे काढण्याबाबत विभागाकडे मागणी केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्नाधिन रस्त्याचे द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत काम मंजूर आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीतअसून निविदा निश्चिती करुन निधीच्या उपलब्धतेनुसार गटारे खोल करण्याचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड विधानसभा मतदार संघातील (जि.यवतमाळ) ढाणकी ग्रामपंचायतीला तालुक्याचा दर्जा मिळण्याबाबत**

**(३०) १२०९४३ (२४-०७-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड विधानसभा मतदार संघातील (जि.यवतमाळ) ढाणकी ग्रामपंचायतीला तालुक्याचा दर्जा मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी वारंवार मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देऊनही अद्यापही याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ढाणकी ग्रामपंचायतीला तालुक्याचा दर्जा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१०-२०१८) :** (१) व (२) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यांचा विचार करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पश्चिम द्रुतगती मार्ग आणि पूर्व द्रुतगती मार्गावरील सूचना फलकांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३१) १२१५६३ (२०-०७-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम द्रुतगती मार्ग आणि पूर्व द्रुतगती मार्गावरील सूचना फलकांची अनेक महिन्यांपासून दुरवस्था झाली असल्यामुळे प्रवाशांना आणि वाहनचालकांना फलकांवरील सूचना समजण्यात अडचणी येत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,  यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या सूचना फलकांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रश्नाधीन सूचना फलक अतिवृष्टीमुळे व सततच्या वाहनांच्या धुरामुळे खराब झाले असून तयांची दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच ,काही सूचना फलके नव्याने लावण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे हिसामनगर (ता.देवणी, जि.लातूर) येथील दलित समाजाच्या स्मशानभुमीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत**

**(३२) १२२०७३ (२०-०७-२०१८). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे.हिसामनगर (ता.देवणी, जि.लातूर) येथील दलित समाजाच्या स्मशान भुमीवर (सर्वे नं.५२ एकुण क्षेत्र ६२ आर) अतिक्रमण करण्यात आले असून सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व मा.महसूल राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१८ रोजी व जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जानुसार त्यांनी उक्त स्मशान भुमीच्या जागेची मोजणी करण्याचे आदेश संबंधित महसूल अधिकाऱ्यांना दिले असून जमिनीच्या मोजणीसाठी हिसामनगर ग्रामपंचायत कार्यालयाने भुमी अभिलेख कार्यालय, देवणी यांच्याकडे रकमेचा भरणा केला असतानाही भूमिचे मोजमाप अद्यापही पुर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागेची अद्यापि मोजणी न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या स्मशानभुमीवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत तसेच जमिनीच्या मोजणीस विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) :** (१) श्री.गणपत सदाशिव पाटील यांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री व मा.महसूल राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१८ रोजी व जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दि.२०.०४.२०१८ रोजी निवेदन सादर केले आहे.
(२) व (३) यापूर्वी सदर जागेची मोजणी करण्यासाठी दि.३०.११.२०११ व दि.१.१२.२०११ अशी तारीख निश्चित करण्यात आली होती.  तथापि, मोजणी साहित्य व मजूर उपलब्ध नसल्यामुळे मोजणी काम करता आले नसून तसा पंचनामा नोंदविण्यात आलेला आहे.  त्यानंतर श्री.पाटील

यांच्या दि.२०.०४.२०१८ रोजीच्या अर्जानुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी दि.२३.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये संबंधित महसूल अधिकाऱ्यांना स्मशानभूमी अतिक्रमणाबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, देवणी यांनी अर्जदारास मोजणीसंदर्भातील आवश्यक बाबींची पर्तूता करण्याबाबत दि.२९.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तदनंतर, दि.२२.०६.२०१८ अशी मोजणीची तारीख निश्चित करण्यात आली. उक्त दिवशी ETS मशीनच्या सहाय्याने मोजणी करण्यात आली असून मोजणी कामी तक्रारदार किंवा त्यांच्या वतीने कोणीही हजर नव्हते असे पंचनाम्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. सबब, मोजणी पूर्ण झालेली आहे.

(४) वरीलप्रमाणे दि.२२.०६.२०१८ रोजी केलेल्या मोजणीनुसार स.नं.५२ या सरकारी मसनवट जागेत कोणतेही अतिक्रमण झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर- मुंबई या महामार्गाचे सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील काम पूर्ण करणेबाबत**

**(३३) १२२२८० (२०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई (एमएसएच-१२) या महामार्गाचे सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील हायब्रीड ॲन्युटी योजनेअंतर्गत मंजूर झालेले काम पूर्ण करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, व प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या याबाबत चौकशी करून सिंदखेडराजा तालुक्यातील या महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०८-२०१८) :** (१) होय.

(२) सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग घोषित झाल्याने या रस्त्याचे हायब्रीड ॲन्युईटीचे काम वगळण्यात आलेले आहे. सदरहू रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागास हस्तांतरणापर्यंत या रस्त्याची देखभाल दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(३४) १२२३५२ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील न्यायालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे इमारतीच्या पुनर्बांधणीचा निर्णय शासनाने घेतला असून यासाठी ३८ कोटी १५ लाख ७० हजार रुपये एवढा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे न्यायालयाचे कामकाज न्यायालयातील वकील बाररुमध्ये स्थलांतकरित करण्यात येणार असून त्यासाठी २६ लाख ६ हजार ४७९ रुपये खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीचे तातडीने बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रके मंजूर असून कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कार्यारंभ आदेश दि.१९/०६/२०१८ रोजी देण्यात आले असून काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा- लातूर या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ साठी करावयाच्या भूसंपादनाबाबत**

**(३५) १२२३६६ (२०-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-लातूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ साठी करण्यात यावयाच्या भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कलम ३ (सी) २ प्रमाणे दिलेल्या नोटिशीवर म्हसवड ते टेंभुर्णी येथील स्थानिक शेतकऱ्यांनी आक्षेप घेऊन आपले लेखी म्हणणे सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त आक्षेपाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सातारा-लातूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ साठी कलम ३A अधिसूचना प्रसिध्दीनंतर स्थानिक शेतकऱ्यांचे आक्षेप अर्ज व लेखी म्हणणे बाबत, भूसंपादन प्रक्रीयेबाबत नियुक्त सक्षम प्राधिकारी (CALA) तथा उप जिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ११, सोलापूर यांचेमार्फत चौकशी

करण्यात आलेली आहे. सुनावणी दरम्यान प्राप्त सदर लेखी म्हणणे अभिप्रायाकरीता संपादक मंडळ तथा MSRDC यांचेकडे पाठविले असुन संपादक मंडळ तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फत आक्षेप अर्जावर चौकशी चालु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्री.निवृत्ती गायकवाड, उपविभागीय अधिकारी यांच्या गैरवर्तनाबाबत**

**(३६) १२२५६४ (२०-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.निवृत्ती गायकवाड, उपविभागीय अधिकारी (ता.बिलोली, जि.नांदेड) हे महिला तलाठी कर्मचाऱ्यांना अश्लिल हावभाव करणे, लाच घेणे, रेती तस्करांसोबत संगनमत करणे इत्यादी प्रकारे गैरवर्तन करीत असल्यामुळे याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, देगलूर-बिलोली यांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार श्री.निवृत्ती गायकवाड यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) मा.लोकप्रतिनिधी यांची अशा स्वरुपाची तक्रार शासनास प्राप्त झाली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना शासनस्तरावरुन कळविण्यात आले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सप्टेंबर २०१८ मध्ये सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालूक्याचे विभाजन करण्याबाबत**

**(३७) १२२८२२ (२०-०७-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही (जि.चंद्रपूर) हे दोन्ही तालूके फार मोठे असल्याने प्रशासकीय व महसुली कामकाजाच्या दृष्टीने दोन्ही तालूक्याचे विभाजन करण्याची मागणी तालूक्यातील नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी तालूक्याचे विभाजन करून मेंडकी तालूक्याची निर्मिती करण्याबाबत व सिंदेवाही तालूक्याचे विभाजन करून नवरगाव तालूक्याची निर्मिती करण्याबाबतची मागणी करणारे लेखी निवेदन लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी मा.महसूल मंत्री, आयुक्त, नागपूर विभाग व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने ब्रम्हपूरी तालूक्याचे विभाजन करून मेंडकी व सिंदेवाही तालूक्याचे विभाजन करून नवरगाव तालूक्याची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१०-२०१८) :** (१) व (२) होय.
(३) तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची तपासणी करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरणात्माक निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शासन मान्यतेने सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३८) १२३०७९ (२०-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागात उपअभियंता, शाखा अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी व लिपीक यांची किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,
(२) असल्यास, करमाळा तालुक्यातील रस्ते व इमारतीची अंदाजपत्रके, नकाशे व सर्वेक्षणाची कामे तसेच नागरिकांची कामे प्रलंबित असल्याने रिक्त पदे तातडीने भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने करमाळा येथील सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) करमाळा (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागात मंजूर, कार्यरत व रिक्त पदांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :-

अ) उपअभियंता यांचे १ पद मंजूर असून ते पद भरले आहे. सद्यस्थितीत तेथे उपअभियंत्याचे पद रिक्त नाही.

ब) शाखा अभियंता यांची ५ पदे मंजूर असून २ पदे कार्यरत आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन आदेश दि.१४.९.२०१८ अन्वये १ शाखा अभियंता यांची बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

क) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांची ४ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहे.

ड) वरिष्ठ लिपिक यांचे १ पद मंजूर असून सदर पद रिक्त आहे.

ई) कनिष्ठ लिपिक यांची २ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत.

(२) होय.

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन आदेश दि.१४.९.२०१८ अन्वये १ शाखा अभियंता व १ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांची बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे. वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक यांचे नियुक्ती प्राधिकारी संबंधित अधिक्षक अभियंता, सा.बां.परिमंडळ हे असल्याने सदर वरिष्ठ लिपिकाचे १ रिक्त पद भरणेबाबत सा.बां.मंडळ, सोलापूर यांचे स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड ते जव्हार (जि.पालघर) या मार्गावरील साखरे पुलाचे बांधकामाबाबत**

**(३९) १२३६०५ (२०-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड ते जव्हार (जि.पालघर) या मार्गावरील साखरे पुलाचे बांधकाम गत दोन वर्षापासून सुरु असूनही अद्याप पुर्ण झाले नाही आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करून पूल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व काम निश्चित किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकीत मुख्य पुलाचे काम प्रगतीत असून सद्यस्थितीत ९०% काम पूर्ण झाले तसेच पोच मार्गाचे काम प्रगतीत आहे. जानेवारी, २०१९ पर्यंत काम पूर्ण करण्याचे व पुल वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.

---

**अमरावती तहसिलचे विभाजन करण्याबाबत**

**(४०) १२३७७८ (२०-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून अमरावती तहसिलच्या विभाजनाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याने तहसिल कार्यालाला सुमारे १५ लाख लोकसंख्येचा कारभार सांभाळा लागत असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती तहसिल विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन अमरावती पूर्व व पश्चिम असे दोन विभाग करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) होय.

(२) तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची तपासणी करून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरणात्माक निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. शासन मान्यतेने सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील चौफुला-नाव्हरा-शिक्रापूर-चाकण-तळेगाव दाभाडे या रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत**

**(४१) १२३९७४ (२०-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील चौफुला-नाव्हरा-शिक्रापूर-चाकण-तळेगाव दाभाडे या रस्त्याचा समावेश राष्ट्रीय महामार्गात करण्यात आला असून या रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत लोकप्रतीनिधिनी दिनांक १२ मे, २०१८ वा त्यासुमारास संबंधितांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त रस्त्याचे काम तातडीने सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) रस्ता सुस्थितीत ठेवणेसाठी आवश्यक त्या लांबीमध्ये मंजुर असलेली कामे प्रगतीत आहे.
केंद्र शासनाच्या दि.०३.०१.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे घोषित चौफुला-न्हावरा-शिक्रापूर-चाकण-तळेगांव दाभाडे या राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ डी चे चौपदरीकरण करणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत असल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथील तहसिल कार्यालयाच्या बांधकामाबाबत**

**(४२) १२४१०५ (२०-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उदगीर (जि.लातूर) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या तहसिल कार्यालयाची दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी भिंतीला व छताला तडे गेल्याचे माहे मे, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कार्यालयातील कर्मचारी आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरीकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून गत वर्षीच्या पावसाळ्यात इमारतीच्या दालनामध्ये पाणी साचल्याने अनेक महत्वपूर्ण जुने दस्तावेज भिजून नष्ट झाले आहे तसेच नवीन तहसील बांधकामाच्या ९ कोटी ८७ लाख रुपयाच्या प्रस्तावास एक वर्षापूर्वी मंजूरी मिळूनही निधी अभावी काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून उदगीर येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) उदगीर (जि.लातूर) येथील तहसिल कार्यालयाच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणे शक्य व्हावे यासाठी अधिकचे स्विकारार्ह दायित्व निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव नियोजन विभागास सादर करण्यात आला आहे. नियोजन विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर उदगीर जि.लातुर येथील तहसिल कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास निधी उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथील गुरुद्वारा बोर्डाची मुदत संपल्याबाबत**

**(४३) १२४४२३ (२०-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील शीख समाजाच्या गुरुद्वारा बोर्डाची मुदत दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास संपलीअसतानाही सदरील गुरुद्वारा बोर्ड शासनाने बरखास्त केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुरुद्वारा बोर्ड बरखास्त करण्याबाबत दिनांक १ जुन, २०१८ रोजीपासून संबंधीतांनी चक्री उपोषण करुन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून तातडीने गुरुद्वारा बोर्ड बरखास्त करण्याबाबत तसेच नवीन बोर्ड सदस्य नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१८) :** (१) नांदेड येथील गुरुव्दारा बोर्डाचे स्थापनेस दि.१५.०३.२०१८ रोजी तीन वर्ष पूर्ण झाली असून नवीन बोर्ड स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. नवीन बोर्ड स्थापन होईपर्यत व बोर्डाचे कामकाज सुरळीत सुरु रहावे यासाठी अस्तित्वात असलेले बोर्ड कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) दि.०१.०६.२०१८ ते १९.०६.२०१८ या कालावधीत स.मनप्रीतसिंघ गोबिंदसिंघ कुंजीवाले व इतर हे जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे उपोषणास बसले होते.

(३) नवीन गुरुव्दारा बोर्ड स्थापन करण्यासाठी अधिसूचना दि.२७.०६.२०१८ अन्वये नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री.हजूर अपचलनगर साहिब अधिनियम, १९५६ च्या कलम ६ पोटकलम (१) च्या खंड (ii) च्या परंतुकानुसार तीन सदस्यांच्या निवडणूकीसंदर्भात अधिसूचना जाहिर करण्यात आली आहे. तसेच पत्र दि.१७.०७.२०१८ अन्वये बोर्डाच्या इतर नामनिर्देशित सदस्यांचे नामनिर्देशन मागविण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर नवीन बोर्ड गठन करण्याचे योजिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेडशी ते चोंढी (ता.बाळापूर जि.अकोला) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४४) १२४५७२ (२०-०७-२०१८). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेडशी ते चोंढी (ता.बाळापूर, जि.अकोला) या दोन जिल्हयाच्या हद्दीवरील महत्वाच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मेडशी ते चोंढी हा रस्ता अकोला व वाशिम या दोन जिल्हयाच्या हद्दीवरील सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला व वाशिम यांच्याकडे देखभाल व दुरुस्तीसाठी आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांचेकडून सन २०१७-१८ मध्ये व्दिवार्षिक योजनेत्तर कार्यक्रमा अंतर्गत खड्डे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच वाशिम जिल्हयातील कि.मी. ०/०० ते १/५५० रस्ता डांबरी पृष्ठभाग आहे. कि.मी. १/५५० ते ३/०० रस्त्याचे खडी नुतनीकरण करण्यात आले असून, कि.मी. ३/०० ते ५/५०० या रस्ता लांबीत व्दिवार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत काम मंजुर असून, खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वडगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गाव चावडीच्या इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(४५) १२४६०८ (२०-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वडगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गाव चावडीच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाल्याने इमारत कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत अत्यंत जुनी असून या इमारतीमध्ये ४६ वर्षापासून गाव चावडी व ग्रामपंचायतीची कार्यालये आहे तसेच इमारतीच्या बांधकामाबाबत सातत्याने मागणी करुनही निधी देण्यात आला नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन इमारतीच्या बांधकामाकरिता तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) सदर गाव स्वतंत्र सज्जाचे गाव नसल्याने गाव चावडी बांधकामासाठी प्रस्ताव सादर केलेला नाही.
(३) सदर गाव स्वतंत्र सज्जाचे गाव नसल्याने गाव चावडी बांधकामाकरिता निधी उपलब्ध करुन देता येणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किणे-कोळींद्रे (ता.आजरा, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४६) १२४८९० (२०-०७-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किणे-कोळींद्रे (ता.आजरा, जि.कोल्हापूर) या रस्त्याच्या दुतर्फा मोठी झाडे-झुडपे वाढल्यामुळे रस्ता अतिशय अरुंद झाला असून त्यामुळे वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत व वाढलेली झाडे-झुडपे तोडण्याबाबत दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याचे रुंदीकरण करून वाढलेली झाडे-झुडपे तोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०९-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित किणे-कोळींद्रे हांदेवाडी बटकणंगले हा मार्ग प्रजिमा ६२ असा असून दि.०७ मार्च,२०१८ रोजीचे स्थानिक लोकप्रतीनीधींचे निवेदन विभागास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) प्रश्नाधिन किणे-कोळींद्रे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा करणारी झाडे-झुडपे सन २०१७-१८ च्या द्विवार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमाअंतर्गत साफ करण्यात आली आहेत. तसेच विशेष दुरुस्ती कार्यक्रम सन २०१७-१८ मधुन सदर रस्त्याचे डांबरीकरण, नुतनीकरण व रुंदीकरण ही कामे करण्यात आली आहेत.

सद्य:स्थितीस रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**फलटण (जि.सातारा) तालुक्यातील फलटण ते बारामती या रेल्वे मार्गासाठी जमीन संपादित करण्याबाबत**

**(४७) १२४९०७ (२०-०७-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फलटण (जि.सातारा) तालुक्यातील फलटण ते बारामती या रेल्वे मार्गासाठी शेतक-यांनी त्यांच्या बागायत क्षेत्रातील जमिनी देण्यास विरोध केल्याने सदर रेल्वे मार्ग रखडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणंद ते फलटण मार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीची व अन्य मालमत्तेची नुकसान भरपाई अद्यापपर्यंत शेतकर्यांना देण्यात आली नसल्याचेही दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार फलटण ते बारामती या रेल्वे मार्गासाठी शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन जमीन संपदन करण्याबाबत तसेच लोणंद ते फलटण मार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

फलटण ते बारामती रेल्वे मार्गासाठी मौजे कांबळेश्वर, खुंटे व सस्तेवाडी येथील जमीन संपादित करण्यात येत आहे. मौजे सस्तेवाडी, ता. फलटण येथील काही शेतकऱ्यांनी सुरुवातीला बागायती जमीन देणेस विरोध दर्शविला होता. परंतू त्यांना प्रकल्पाविषयी माहिती दिल्यानंतर, त्यांच्या संमतीने तिन्ही गावांतील संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आली आहे. खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही, लोणंद ते फलटण रेल्वे मार्गासाठी एकूण ३,८३२ खातेदारांची जमीन संपादित कऱण्यात आली असून त्यांपैकी ३,४२१ खातेदारांना भूसंपादनाचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे. न्यायालयीन प्रकरणे व सहहिस्सेदार यांचे संमतीपत्र न मिळाल्याने उर्वरित ४११ खातेदारांना मोबदल्याची रक्कम अदा करणे शिल्लक आहे. पूर्तता करून घेऊन मोबदला वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) फलटण ते बारामती रेल्वे मार्गासाठी शेतकऱ्यांच्या संमतीने संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच लोणंद ते फलटण रेल्वे मार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या एकूण ३,८३२ खातेदारांपैकी ३,४२१ खातेदारांना भूसंपादनाचा मोबदला अदा करण्यात आला असून उर्वरित ४११ खातेदारांना मोबदला वाटप करण्याची कार्यवाही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) मतदारसंघातील मौजे सालसे-कुर्डुवाडी-माढा या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) १२५१८१ (२०-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) मतदारसंघातील मौजे सालसे- कुर्डुवाडी-माढा (रा.मा.क्र.२०२) या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ मे, २०१८ रोजी निवेदनाव्दारे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने उक्त रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्नांकीत सालसे- कुर्डुवाडी -माढा रस्ता रा.मा.२०२ असा आहे. सदर रस्ता सुधारणा कामासाठी हायब्रिड ॲन्युटी अंतर्गत नीधीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या रस्त्याच्या लांबीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत असुन लवकरच निविदा प्रक्रिया पुर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यमार्ग क्रमांक १७७ वर अनधिकृतरित्या टाकलेली ऑप्टिकल फायबर केबल काढून टाकण्याबाबत

**(४९) १२५३६५ (२०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्थसंकल्पीय अधिवेशन सन २०१६-१७ मध्ये तारांकित पश्न क्र. ४०८६० ला उत्त्तर देतांना रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर अंतरावर केबल टाकण्याचा नियम असतानाही केबल टाकल्या गेल्या असतील तर तेथील डेप्युटी इंजिनिअर व ज्याच्या अंतर्गत हे काम चालते तोच त्याला जबाबदार राहिल आणि त्याच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल असे आश्वासन मा,सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्वासनाअतंर्गत राज्यमार्ग क्रमांक १७७ वरील किमी ५३/८७७ ते ८५/००मध्ये रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटर अंतराच्या आत रिलायन्स जिओ कंपनीने अनधिकृतरित्या टाकलेली ऑप्टिकल फायबर केबल काढून टाकण्याबाबत तसेच कार्यकारी अभियंता यांनी नोटिस बजावून देखील सदर केबल अदयापही न काढणाऱ्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैभववाडीचे तत्कालिन उपअभियंता श्री.कचरे यांचेवर अदयापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैभववाडीचे तत्कालिन उपअभियंता श्री कचरे यांचेवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत तक्रार कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री अनुपम कांबळी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे दिनांक २९ मे,२०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैभववाडीचे तत्कालिन उपअभियंता श्री. कचरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करुन संबंधित कंपनीने

अनधिकृतरित्या टाकलेली केबल  काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कुडाळ, मु.कणकवली यांनी दि.२८.०३.२०१८ व दि.१८.०५.२०१८ च्या पत्रान्वये रिलायन्स जिओ कंपनीला कळविण्यात आले असुन त्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. तसेच श्री.कचरे,तत्कालीन उपअभियंता, यांचेकडून आवश्यक तो खुलासा सा.बां. विभाग, कुडाळ मु.कणकवली यांनी मागितला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई इलाखा शहर सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत केलेल्या देखभाल दुरूस्तीच्या कामांच्या देयकाबाबत**

**(५०) १२६२८० (२०-०७-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इलाखा शहर सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण १३ मजूर सोसायटयांच्या माध्यमातून कामे केल्याचे भासवून श्री.अशोक विठ्ठल सोनावणे यांनी सन २०१०-२०११, २०११-२०१२ या आर्थिक वर्षातील देखभाल दुरूस्तीच्या कामांच्या देयकांची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांच्या देयकांशी सदर व्यक्तीचा काहीही संबंध नसल्याबाबत मुंबई इलाखा शहर सा. बां. विभागाने शासनास कळविले असतानाही श्री.अशोक विठ्ठल सोनावणे यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याऐवजी  कामांच्या देयकांची रक्कम देण्याचा प्रयत्न वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत केला जात आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित व्यक्ती व अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०९-२०१८) :** (१) होय.
(२), (३), (४) व (५) श्री.अशोक विठ्ठल सोनवणे यांनी त्यांची देयके मिळण्यासाठी मा.लोकआयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडे निवेदन केले होते. त्या संदर्भात मा.लोकआयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दि. १८/४/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने

श्री.अशोक विठ्ठल सोनवणे यांनी केलेल्या तक्रार प्रविष्ठ कामांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने व्ही.एन. आय.टी. नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेला फॉरेन्सिक ऑडिट रिपोर्ट तसेच कार्यकारी अभियंता /अधिक्षक अभियंता /मुख्य अभियंता यांचेमार्फत प्राप्त झालेला प्रस्ताव / अहवाल विचारात घेऊन, खात्री पटलेल्याच पूर्ण करण्यात आलेल्या, बाबीच्या अनुषंगाने परिगणित करण्यात आलेल्या रु. ६०,८०,३८८/- इतक्या एकूण किंमतीची देयके सर्व संबंधीतांना अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार एकूण रु. ६०,८०,३८८/- च्या देयकांपैकी रु.२७,९४,२४६/- रक्कमेचीच देयके माहे जून २०१८ मध्ये संबंधीत कंत्राटदारांना अदा करण्यात आलेली आहेत.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.